**अत्यंत तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/२४४/२०१९
दिनांक :-१६ /०४/२०१९

**विषय :- माहिती अधिकारात मागविलेली माहिती विहित मुदतीत देणे व मा.खासदार, आमदार, पदाधिकारी व विविध संघटना यांचे निवेदन व तक्रारींबाबत...**

**परिपत्रक**

प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख बनविणेकामी जनतेच्या तक्रारींची दखल घेणे, तसेच तक्रारींचे विहित मुदतीत निराकरण करणे आवश्यक आहे. या समान विषयाचे अनुषंगाने यापूर्वी परिपत्रक क्र.प्रशा/२/कावि/२८८/२०१७ दि.१५/०६/२०१७ व परिपत्रक क्र.प्रशा/२/कावि/८५/२०१८ दि.२६/०४/२०१८ अन्वये सर्व विभागप्रमुखांना मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही विभाग लोकप्रतिनिधी, नागरिक, विविध संघटनांकडून प्राप्त होणारी निवेदने, तक्रारींवर विहित वेळेत कार्यवाही करत नाहीत. किंबहुना टाळाटाळ केली जाते अथवा उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. यावरुन कर्मचारी / अधिकारी वर्गाची वृत्ती जुजबी, उदासीन तर कधी कधी शुद्ध निष्काळजीपणाची व उर्मटपणाची आढळून येते.

तथापि, प्राप्त निवेदने, माहिती अधिकार अर्ज, तक्रारीं विषयीचा सर्व पत्रव्यवहार यांना प्रथम प्राधान्यक्रम देऊन त्यांचा त्वरीत निपटारा करणे आवश्यक आहे. तसेच, काही निवेदनांवर व तक्रारींचे स्वरुप प्रतिक्षाधीन असल्यास त्याकरिता किती कालावधी लागणार आहे याबाबत तसे कळविणे आवश्यक आहे.

तसेच, माहिती अधिकारात प्राप्त झालेल्या अर्जांवर देखील विहित वेळेत कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे मनपाच्या माहिती अधिकार प्रलंबित अर्जांची संख्या जास्त प्रमाणात दिसून येते. तसेच, अनेक विभाग मनपाच्या माहिती अधिकार ऑनलाईन संगणकप्रणालीचा वापर करत नाहीत. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असून कार्यालयीन सुसूत्रतेस धरुन नाही. त्यामुळे मनपाचे विश्वासार्हतेस तडा जात आहे.

तरी, या परिपरत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना सूचित करणेत येते की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदारास विहित वेळेत माहिती देण्यात यावी व सदर कायद्याची व्यवस्थितरीत्या अंमलबजावणी करणेत यावी. अर्जदाराने माहिती टपालाने मागविली असल्यास ती RPAD व्दारे पाठविणेत येऊन त्याची पोहोच ठेवण्यात यावी. तसेच, माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचे कोणाकडूनही उल्लंघन होणार नाही याबाबत संबंधित विभागप्रमुखांनी / अपिलीय अधिकाऱ्यांनी / जनमाहिती अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी व मनपाच्या ऑनलाईन माहिती अधिकार संगणकप्रणालीचा वेळोवेळी वापर करून वेळेत पूर्तता करावी. तसेच, उपरोक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही न केल्यास अथवा याबाबत माझेकडे अशा प्रकारच्या तक्रारी पुन:श्च प्राप्त झालेस अथवा वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करणेस कसूर केल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल व त्याची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी. सर्व विभागप्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व स्वअंगीकृत करुन सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करावे.

(श्रावण हर्डीकर)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,
मनपाचे सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख